# पुणे महानगरपालिका

## जाहिरात प्रकटन

पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहाय्यक विधी अधिकारी, वर्ग-२ या रिक्त पदावर सहा महिने करिता, करार पद्धतीने, एकवट मानधनावर सेवा घ्यावयाची असल्याने अनुभवधारक उमेदवारांकडून www.pmc.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाइन पध्दतीने दि.०८/०७/२०२२ ते दि.१५/०७/२०२२ अखेर या कालावधीत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | एकवट मासिक मानधन रुपये | एकूण पदांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | सहाय्यक विधी अधिकारी, वर्ग-२ | ३७,२०५/- | ०४ |

वरील पदासाठीची सविस्तर जाहिरात शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, रिक्त पदाची संख्या, विहित परीक्षा शुल्क, अर्ज करावयाची पध्दत, विविध महत्वाचे दिनांक, मुलाखत इत्यादीबाबत तपशील व इतर सर्वसाधारण सूचना पूणे महानगरपालिकेच्या www.pmc.gov.in या संकेतस्थळावर Recruitment या सदरात उपलब्ध आहेत. याचे उमेदवारांनी काळजीपूर्वक अवलोकन करुन अर्ज करावेत.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

ठिकाण: पुणे
दिनांक:
जाहिरात क्र.:-

# पुणे महानगरपालिका
## जाहिरात प्रकटन

पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहाय्यक विधी अधिकारी, वर्ग-२ या रिक्त पदावर सहा महिने करिता, करार पद्धतीने, एकवट मानधनावर सेवा घ्यावयाची असल्याने अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता व अनुभव | एकवट मासिक मानधन रुपये | एकूण पदांची संख्या | गट |
|---|---|---|---|---|---|
| १. | सहाय्यक विधी अधिकारी, वर्ग-२ | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी.<br>ब) शासकीय/निम शासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थकेडील न्यायालयीन कामाशी संबंधित पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव किंवा सत्र न्यायालयातील ३ वर्षे वकिलीचा अनुभव धारण करणा-या उमेदवारामधून सरळसेवेने नेमणूक करता येईल. | ३७,२०५/- | ४ | अनुसूचित जाती – ०१,<br>वि.जा.अ. – ०१,<br>सर्वसाधारण (खूला)- ०२ |

**अटी -**

१. वरील पदासाठी जाहिरातीचे दिनांकास उमेदवाराचे वय कमीत कमी १८ वर्षे असणे आवश्यक असून खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे, मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. तसेच अपंग उमेदवारांचे वय ४५ पेक्षा जास्त नसावे.

२. शैक्षणिक पात्रता व अनुभव असणे आवश्यक.

३. **महाराष्ट्र व गोवा बार कॉन्सिलची मान्यता प्राप्त सनद**.

४. **अर्जदार यांचे आधारकार्ड व पॅनकार्ड अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे**.

५. सदरचे पद अत्यंत अस्थायी स्वरूपाचे असल्याने या पदावर कायमस्वरूपीची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही.

६. सदर पदावरील नेमणूक गुणवत्तेवर करण्यात येईल.

७. उमेदवारांनी अर्जासोबत दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, आवश्यक मूळ कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती व अनुभवाच्या मूळ सत्यप्रतीचे दोन संच सादर करणे आवश्यक आहे.

८. अर्ज करताना उमेदवारांची जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा जन्मतारखेची नोंद असलेली शालान्त परीक्षेच्या उत्तीर्ण प्रमाणपत्राची छायांकितप्रत जोडणे आवश्यक.

९. अर्जदार विवाहित महिला असल्यास नावात बदल केला असल्यास प्रमाणपत्र (शासनमान्य) जोडावे.

१०. उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज सादर करणे आवश्यक असून त्यासोबत वय, शैक्षणिक अर्हता, गुणपत्रक, प्रमाणपत्र, जातीचा दाखला, एम.एस.सी.आय.टी अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या कागदपत्रांच्या/ प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्य प्रती (ट्रू-कॉपी) जोडने आवश्यक आहे, विहित पात्रता व अनुभव धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज अपात्र समजण्यात येतील.

११. निवड झालेल्या उमेदवारास विहित नमुन्यात करारनामा करून फक्त ६ महिन्यांकरिता नेमणूक दिली जाईल. करारनामा करावयाचा खर्च संबंधित उमेदवाराने करावयाचा आहे.

१२. मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांनी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१३. वरील पदासाठी नियुक्त होणाऱ्या सेवकास महानगरपालिकेच्या विधी विभागा अंतर्गत काम करावयाचे असून सदर कामाचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

१४. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१५. उमेदवारास नियुक्ती देण्याबाबतचे सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१६. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१७. निवड झालेल्या उमेदवारास सेवेत रुजू होण्यापूर्वी एक महिन्याचे मानधन अनामत रक्कम म्हणून भरावे लागेल व त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

१८. वरील पदासाठी मा. महापालिका आयुक्त यांचे नावे असणारा पुणे मनपाच्या www.punecorporation.org किंवा www.pmc.gov.in या संकेतस्थळावर असणारा छापील अर्ज डाउनलोड करण्यात यावा सदरचा अर्ज सुवाच्छ अक्षरात संपूर्णपणे भरुन आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करणे आवश्यक आहे.

१९. एक महिन्याचे मानधन चलनाव्दारे रक्कम रु. ३७,२०५/- एवढी रक्कम पुणे मनपाच्या कोषागारात भरावी.

२०. प्राप्त अर्जांच्या संख्येनुसार लेखी/तोंडी परीक्षा घेणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

२१. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही स्तरावर सदर प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

२२. सदरचे कालावधीत उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास केव्हाही कामावरुन कमी करण्याचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

वरील पदाकरिता शैक्षणिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांनी ०८/०७/२०२२ ते दि.१५/०७/२०२२ या कालावधीत सकाळी १०.०० ते सायं. ६.०० कार्यालयीन वेळेत (कार्यालयीन सूट्टया वगळून) आपले अर्ज आवश्यक कागदपत्रांसहित विधी विभाग, खोली क्र. २१९, दुसरा मजला, मुख्य इमारत, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे - ४११००५ येथे सादर करावेत. विहित मुदतीनंतर अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. सदरची जाहिरात ही www.pmc.gov.in या संकेतस्थळावर Recruitment या सदरात उपलब्ध आहे.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

ठिकाणः पुणे
दिनांकः
जाहीरात क्र.-

**पुणे महानगरपालिका**
**६ महीने करार पध्दतीने सेवा घेणेबाबत.**

विधी विभागाकडील ...................... या जागेसाठी प्रस्तुत अर्ज करीत आहे.

संदर्भः- जाहीरात क्र. दिनांकः

---

(खालील मजकूर स्वहस्ताक्षरात लिहावा.)

१. संपूर्ण नावः (प्रथम आडनाव लिहावे)
श्री/सौ/श्रीमती.........................................
(आवश्यक नसेल ते खोडावे)
........................................................

२. पत्ताः-
........................................................

........................................................

३. राष्ट्रीयत्वः

४. जात (पोट जातीसह)व प्रवर्गः-

५. जन्म दिनांकः-

| दिनांक | महिना | सन |
|---|---|---|

६. शैक्षणिक पात्रताः-

| परिक्षेचे नांव | गुणांचे शेकडा प्रमाण व श्रेणी | कितव्या प्रयत्नात उत्तीर्ण झालात | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

७. मातृभाषाः-

८. पूर्वीच्या कामाचा व अनुभवाचा तपशील खालील रकान्यात भरावा.

| कामावर ठेवणा-या व्यक्तीचे /संस्थेचे नाव व पत्ता | कामावर रुजू झाल्याचा दिनांक | काम सोडल्याचा दिनांक कारणासह | नेमणूक झालेल्या जागेचा हुद्दा | मिळालेली वेतनश्रेणी व भत्ते |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

९. वडीलांचे नांव व पत्ताः- ............................................

............................................

१०. ई मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांकः- ...................................

......................................

मी असे खात्रीपूर्वक विधान करतो की, वर दिलेली सर्व माहीती माझ्या ज्ञानाप्रमाणे व समजूतीप्रमाणे खरी आहे. मी असेही निश्चयपूर्वक नमूद करतो की, नोकरीच्या प्रवेशासंबंधीचे तसेच इतर नियम व कानून मी वाचले असून ते मला मान्य आहेत.

ठिकाणः
दिनांकः

.....................................
अर्जदाराची स्वाक्षरी

# प्रपत्र- अ

## स्वयंघोषणापत्र

अर्जदाराचा फोटो

मी, --------------------- श्री. ---------------------- यांचा मुलगा/मुलगी वय---- वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) ----------------------- व्यवसाय ----------- राहणार ----------------------------- याव्दारे घोषित करतो/करते की, वरील सर्व माहीती माझ्या व्यक्तीगत माहीती व समजूतीनुसार खरी आहे. सदर माहीती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहील याची मला पुर्ण जाणीव आहे.

ठिकाणः-

अर्जदाराची सही ---------